REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# जागतिकीकरण आणि भारतीय प्रशासन

डॉ.रमेश वाघमारे
सहाय्यक प्राध्यापक , लोकप्रशासन विभागप्रमुख , गोदावरी कला,
वरिष्ठ महाविद्यालय अंबड, जि.जालना.

## प्रस्तावना :

प्राचीन काळापासून चालत आलेली भारतीय प्रशासन व्यवस्था ही जनहिताचा विचार करणारीचं होती. काळाच्या ओघात भारतावर वसाहतवाद्यानी सत्ता स्थापण केली. यामध्ये प्रामुख्याने ब्रिटीश शासन हे जास्त वर्ष शासन करून प्रशासनांची वेगळी छाप सोडून गेलेले आहे. सत्ता, साम्राज्य असणाऱ्या व्यवस्थेचे सर्व आदेश, नियम आणि कायदे कसे अंधविश्वासाने स्विकारले जातात, हे या देशामध्ये दुसऱ्यांदा सागण्याची आवश्यकता नाही. परंतू भारतीय प्रशासनाला खरी गती ही स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतरच मिळाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.



स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये अनेकविध कायदे हे ब्रिटिशांनी दिलेली देन आहे. शिवाय आजतागायत मोठ्या प्रमाणांत तेथं अंमलात आणले जात आहेत. स्वतंत्र देशात राज्यघटना निर्माण केली गेली. त्याप्रमाणे राज्यकारभार या देशात चालतो. ज्यामध्ये उच्च–निच्च, श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेद न करता सर्वस्तरापर्यंत शासनाची ध्यैय – धोरणे पोहचविण्यांचे व विकास प्रक्रियेत समविष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रशासनामार्फत चालू आहे. स्वातंत्र्यानंतरच्या जवळपास ३० वर्षानंतर मिश्र अर्थव्यवस्था स्विकारलेल्या या देशात लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेला हळूहळू तडा चाललेला आपणास दिसून येतो. याचे मुख्य कारण म्हणजे १९९१ मध्ये स्विकारलेले नविन आर्थिक धोरण आणि यामधील जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या प्रक्रियेला मिळालेली गती हे होय. जरी या प्रक्रियेची चाहूल ८० च्या दशकात लागलेली असली तरी त्यांचे प्रत्यक्ष परिणाम १९९१ नंतर दिसायला लागलेले आहेत. या जागतिकीकरणांच्या परिणामामध्ये भारतातील कुठलेही क्षेत्र सुरक्षित राहीलेले नाही. यामध्ये प्रशासन तरी कसे मुक्त राहणार ? जो कुठल्याही देशाच्या धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी ही यंत्रणा आहे. धोरण आखणी करणारे शासन कोणत्याही परिस्थितीत, दबावात या अन्य कोणत्याही कारणास्तव राबविण्यांची सक्ती दाखवित असतील तर प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या, अंमलबजावणी करणाऱ्या या यंत्रणेला ती राबवावी लागतात. त्यांचे दृश्य परिणाम जे असतील ते त्या परिस्थितीचे फळ असेल. आणि त्यांचे चांगले व वाईट परिणाम हे भोगावे लागतात याची परिणीती ही आज भारतीय व्यवस्थेसमोर आलेली आहे. प्रस्तूत लेखामध्ये जागतिकी करणामुळे भारतीय प्रशासन व्यवस्थेत कोणते बदल आणि परिणामकारक घटक रूजत आहेत, याचा आढावा घेणे व यामूळे भारतीय प्रशासन व्यवस्थेचा जो

मुख्य उद्देश आहे जो कल्याणकारी राज्याचा तो नष्ट किंवा लोप पावतांना दिसून येतो का ? हे पाहणे हाच मुख्य उद्देश समोर ठेउन मांडणी करण्यांचा प्रयत्न केलेला आहे.

एकीकडे जागतिकीकरणांमुळे जग हे खेडे बनेल, पर्यायाने येथील गरीबी, दारिद्रय, विषमता नष्ट होईल असा गोड गैरसमज काही तज्ञ मंडळी मांडत आहेत. परंतु याची खरी समस्या ही उलट दिशेने व अतिवेगाने वाहते आहे. त्यामूळे येथे प्रशासनाला ही समस्या सोडविणे सुध्दा धोरणात्मक दबावामूळे कष्ठप्रद झालेले आहे. यासाठी काही उपाय—योजना ही त्या—त्या राष्ट्राच्या धोरणांचा व शासनांच्या ईच्छाशक्तीचा फार मोठा वाटा असणार आहे. आता कूठे विकसनशिल आवस्थेतून विकसीत स्थितीत वाटचाल करणाऱ्या राष्ट्राच्या शासन व प्रशासन व्यवस्थेला हे एक फार मोठे आव्हानचं ठरलेले आहे.

## जागतिकीकरण म्हणजे काय ? :

जगतिकीकरण म्हणजे स्थानिय, क्षेत्रीय वस्तू अथवा घटकांना अंतरराष्ट्रीय स्तरावर रूपांतरीत करण्याची प्रक्रिया आहे. शिवाय जागतिकीकरण म्हणजे नुसते मुक्त व्यापार व्यवस्था एवढेच नाही तर व्यापाराबरोबरच संस्कृतीची देवाणघेवाण, दळणवळण, सामाजिक — राजकीय स्थिंततरे या बाबीचाही समावेश होतो.

## प्रशासन म्हणजे काय ? :

भारतीय प्रशासन व्यवस्था ही जनकल्याण व शेवटच्या घटकापर्यंत विविध विकासात्मक धोरणांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा आहे. मूळात प्रशासनांचा अर्थचं शासनांच्या कार्याची व्यवस्था करणे असा होतो. म्हणजेचं राज्यातील सर्व जनतेसाठी आखलेल्या शासनांच्या कार्याची व्यवस्था लावणारी ही यंत्रणा होय. **पिफनर** यांच्या मते निश्चित उद्दिष्टे प्राप्त करण्यांसाठी मानवी व भौतिक साधनांचे संघटन व संचालन करणे म्हणजे प्रशासन होय. प्रशासनाला जागतिकीकरणांच्या स्पर्धात्मक युगात सतत परिवर्तनशिल राहूनच कार्य, भूमिका पार पाडावी लागते. याशिवाय कार्यक्षम, गतिशील व उत्तरदायी राहून कार्य करावी लागतात. परंतू १९९१ च्या नविन आर्थीक धोरणाचा परिणाम हा खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांच्या प्रभावामूळे कल्याणकारी व विकासाच्या प्रक्रियेतील शासन—प्रशासनांची भुमिका किंवा मक्तेदारी संपूष्टात आणून बी.ओ.टी. व निर्गुंतवणुक, पी.पी.पी. या तत्वाचा स्विकार केला जात आहे. मानवी जिवनांच्या प्रत्येक क्षेत्रात या जागतिकीकरणांच्या प्रक्रियेने शिरकाव केलेला आहे. त्यामूळे आज २१ व्या शतकातील जनतेच्या ईच्छा आकांक्षा यांची पूर्तता शासन निर्णय आणि प्रशासन पूर्ण करण्यांस विफल ठरत आहे. यांचे कारण म्हणजे या धोरणांची केली जात असलेली दबावात्मक अंमलबजावणी होय. शिवाय या जागतिकीकरणांच्या युगात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव सुध्दा अधिक वेगाने वाढतो आहे. त्यामूळे त्यांचे चांगले—वाईट परिणाम सद्यस्थितीत आपण पाहत आहोत. नव्या सहस्त्रकातील समाजाच्या गरजा पूर्ण करणारी यंत्रणा ही सक्षम झाली पाहीजे असा वैश्वीक विचार जनमानसात निर्माण झाला. परंतू पारंपारिकरित्या चालणाऱ्या प्रशासन यंत्रणेचा केंद्र बिंदू मात्र आमआदमी असणारा घटक विकासापासून कोसो दुर राहतो आहे. केवळ या धोरणांच्या प्रभावामूळे.

## जागतिकीकरणा नंतरचे प्रशासन :

परंपारिक पध्दतीने चालणाऱ्या प्रशासन व्यवस्थेला या जागतिकीकरणांच्या काळात आलेल्या माहिती तंत्रज्ञानांच्या क्रांतीनंतर व मूक्त व्यापार धोरणांच्या स्विकारामूळे मोठ्या प्रमाणांवर तिलांजली मिळालेले आहे. प्रशासकीय उद्योग, महामंडळे आणि खाती यांचे राष्ट्रउभारणीत फार मोठे स्थान होते. त्याला पहिला धक्का बसला तो ते चांगल्या आवस्थेत असतांना देखील त्यांना डबघाईस आणने व त्यांचे खाजगीकरण करणे किंवा एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीला विकणे. तसेचं काही उद्योग शासनांचे म्हणून बंद पाडायचे यासाठी मागील सरकारच्या काळात स्वतंत्र्य निर्गुंतवणूक खाते सुध्दा निर्माण केले गेले. ही अवस्था प्रशासनांच्या एखाद्या खात्याच्या बाबतीतलीच नसून हे एक प्रतिनिधीक उदाहरण आहे. जी आजची पिढी आणि भावी पिढी ही शासकीय आणि खाजगी असा भेदच करणार नाही.

जागतिकीकरणानंतर भारतीय प्रशासनांमध्ये नवनविन संकल्पनांचा शिरकाव झालेला आहे. ज्या संकल्पना मुळात व्यवस्थापनातील आहेत. जसे — लोकनिवड दृष्टिकोण, लोक—व्यवस्थापन दृष्टिकोन, स्मार्ट प्रशासन, नागरी सनद आणि नव लोकव्यवस्थापन इ. या संकल्पनांचा पूर्ण उपयोग हा उद्योग, कारखाने आणि खाजगी कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणांवर केला जातो. जेथे फक्त नफा कमविणे हा उद्देश असतो. परंतू प्रशासनाला नफा कमवावयाचा नसून जनतेची सेवा करणे, जनहिताची कामे करने किंवा एखाद्याच घटकांच्या हिताला प्राधान्य न देता सर्व समूह, समाजाचा विकास करण्यांचे कार्य करीत असतात.

सार्वजनिक — खाजगी भागीदारी (PPP) बांधा—वापरा आणि हस्तांतरीत करा ( BOT ) या गोडस नावाने जनतेचा प्रशासनांत सहभाग वाढविण्यांच्या उद्देशाने या संकल्पना किंवा पध्दती राबविण्यास सुरूवात झाली. परंतू जनतेचा सहभाग हा प्रशासकीय धोरणा निर्मीतीस असला पाहिजे तर शासन जनताभिमुख राहील यात वादचं नाही. परंतू सार्वजनिक—खाजगी सहभागीदारीसाठी सर्वसामान्य जनता नसून मोठी उद्योजक, कारखानदार, गुंतवणूकदार यांचा समावेश आहे. हे उदारीकरण व जागतिकीकरणांचे फळ आहेत. याशिवाय शासन आज स्थितीला पायाभुत सुविधा निर्मितीमध्ये १००: प्रमाणांत सार्वजनिक खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देत आहे. यावरून स्पष्टपणे दिसून येते की, शासन आपली पूर्ण जबाबदारी झटकु पाहत आहे.

मोठ्या प्रमाणांवर शासकीय उद्योग, महामंडळ आणि खाते ही डबघाईस आणने व ती विकणे किंवा यामध्ये परकिय थेट विदेशी गुंतवणूकीला मोठ्या प्रमाणांवर परवानगी देणे. शिवाय त्यांच्या नियम, अटी व धोरणांस बांधील राहणे हे देखील जागतिकीकरणांचेच फलीत आहे. यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर म्हणजेचं कर्मचारी, यापासून होणारा जनतेचा फायदा या गोष्टीला तिलांजली दिली जात आहे. आज मोठ्या प्रमाणांवर कर्मचारी कपात होत आहे. याचे कारण वाढते तंत्रज्ञान हे होय. या तंत्रज्ञानामूळे बेकारांची फौज निर्माण होत आहे. शिवाय नविन भरतीच्या प्रक्रियेत कंत्राटीकरण केलेले आहे. जिवनावश्यक व अती महत्वांच्या सेवेमध्ये देखील कंत्राटी व मानधन तत्वावर कर्मचारी नियुक्त केले जात आहेत. हे या जागतिकिकरणांचा फार मोठा धोका या प्रशासन व्यवस्थेपूढे आहे.

आज मोठ्या प्रमाणांवर शासन सार्वजनिक उद्योग, व्यवसाय मोडीत काढून त्यांचे खाजगीकरण कसे केले जाईल आणि शासनांची जबाबदारी कशी दुर होईल, याचाचं प्रयत्न होताना दिसुन येत आहे. शासन म्हणून या सर्व जबाबदारीतून मूक्त होऊ पाहते. तर मग शासनाची भुमिका काय ? असा प्रश्न सुज्ञ मंडळी समोर निर्माण होतो. तेव्हा शासन फक्त व्यवस्थापकांची भुमिका पार पाडणार काय ? मानवी समूहाला सुख—चैनीच्या वस्तू वापरास प्रवृत्त करणे आणि मोठया प्रमाणांवर आहे रे आणि नाहीरे वर्ग कसा निर्माण होईल यासाठी प्रयत्न करणे हा जागतिकिकरणांचा सिध्दांत आहे.

ज्या देशातील शासन, हे स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षापर्यंत प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक घटकांपर्यंत विकासाचा रथ घेउन पोहचू शकलेले नाही. त्या देशातील शेतकरी, कष्ठकरी, गरीब, दारिद्री जनता अजूनही दोन वेळेचे अन्न व्यवस्थितरित्या घेऊ शकत नाहीत. त्या देशामध्ये जागतिकीकरणांची ही प्रक्रिया या घटकांना व क्षेत्राला कोठे घेउन जाईल याची कल्पनाच न केलेली बरी.

या जागतिकीकरणांचे काही चांगले परिणाम प्रशासन व्यवस्थेमध्ये पाहावयास मिळतात. या माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे कार्यक्षमतेला गती मिळाली, लालफितीचा धोका काही प्रमाणात कमी होतांना आढळून येतो. पेपरलेस कार्य वाढलेली आहेत. परंतू यामध्येही मोठया प्रमाणांवर धोके आहेत. पारदर्शकता अजूनही कोसोदुर आहे. सु—शासन निर्मितीचा प्रयत्न काही प्रमाणात या व्यवस्थेने स्विकारलेला आहे. याचा मुख्य उद्देश जनतेप्रती उत्तरदायी होणे, कार्यक्षम व कर्तव्यदक्ष कसे राहता येईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिवाय ई—गर्व्हनन्स म्हणजेच इलेक्ट्रॉनिक शासन प्रशासन पध्दती. या आज काळाची गरज बनलेली आहे. माहिती तंत्रज्ञानांच्या क्रांतीचा परिपाक म्हणजेचं ई—गव्हर्नन्स होय. ज्यामूळे आज एका क्लिकवर हवी ती माहिती व हवी ती कार्य होत आहेत.

समाजिक अंकेक्षण ( Social Audit ) ही आजच्या प्रशासन व्यवस्थेत जागृत समाजाचे नियंत्रण होय. कारण शासन हे जगताभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम होत आहे ते समाज आणि राष्ट्रप्रतीचे दायीत्व स्विकारून या ग्लोबल युगात विशेषत: चंगळवादी प्रवृत्तीचा स्विकार केलेल्या युगात Social site

च्या माध्यमातून जगाच्या कानाकोपऱ्यातील घटनेला लोकल रूप येत आहे. त्यामूळे शासनांच्या भुमिका, कार्य यांचे सुध्दा ऑडीट हा समाज करीत असतो. त्यामूळे प्रशासनाला समाजाप्रती असलेले उत्तरदायीत्त्व कर्तव्य म्हणून पूर्ण केलेचं पाहिजे.

## सारांश :

या वरील सर्व बाबी जरी जागतिकीकरणांच्या या काळात काही चांगल्या व काही वाईट वाटत असल्या तरी फार मोठया प्रमाणांत यांच्या परिणामाला सामोरे जावे लागणार आहे. आज या देशातील सार्वजनिक — खाजगी भागीदारी, बांध—वापवरा हस्तांतरीत करा, कर्मचारी कपात, कंत्राटी भरती, निगुंतवणूकीकरण, प्रत्यक्ष थेट परकिय गुंतवणूक, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन, मुक्त व्यापार धोरणांच्या नावाखाली होत असलेली येथील लुट यामूळे येथे प्रत्येक क्षेत्रातील वेगवेगळया घटकांवर होणारे परिणाम हे न भरून येणारे निघणारे आहेत. त्यामूळे जागतिकीकरणांच्या या परिणामांचा सर्वात मोठा धोका येथील सामान्य जनतेला सहन करावा लागणार आहे. याला शासन आणि प्रशासकीय पातळीवर धोरणात्मक रचनेच्या बदलातून विकासाची प्रक्रिया वेगवेगळ्या घटकांपर्यंत व क्षेत्रासाठी भक्कमपणे राबविणेच उपाय होऊ शकतो. अन्यथा श्रीमंत अती श्रीमंत तर गरिब अति गरीब हे फलीत या जागतिकिकरणातून मिळेल, यातून भविष्यात अराजकतेची स्थिती निर्माण झाल्यास आश्चर्य वाटण्यांचे कारण नाही.

## संदर्भ :


१. शर्मा रविंद्र, भारतीय प्रशासन के पच्चास वर्ष, पंचशिल प्रकाशन, नागपूर.
२. खातू गजानन, २००४, जागतिकीकरणाचं दाहक वास्तव, अभय प्रकाशन, मुंबई.
३. गोडबोले माधव, २०११, बखर भारतीय प्रशासनांची, विद्या प्रकाशन, पुणे
४. भटनागर सुभाष, २०१०, ई — गव्हर्नमेंट, डायमंड पब्लिकेशन्स, नई दिल्ली.
५. खातू गजानन, २००४, जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, मुंबई.


LBP PUBLICATION